# रत्नागिरीत साकारतेय रंगीबेरंगी फुलपाखरांची दुनिया

## छंदातून आनंद देण्याचा प्रयत्न

पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या विविध वनराजीमध्ये विहार करणाऱ्या या फुलपाखरांचे विश्व रत्नागिरीतही निर्माण करावे, या उद्देशाने रत्नागिरीतील उद्योजक नंदकुमार पटवर्धन हे आसमंत बेनवोलन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रयत्नशील असून, सहा महिन्यात रत्नागिरीकरांना या फुलपाखरांच्या रंगीबेरंगी जगाचे दर्शन घडणार आहे. पटवर्धन यांनी केवळ छंदापोटी हे वनस्पती उद्यान तयार केले असून, त्यापासून स्वत:ला तसेच इतरांना आनंद मिळावा, हाच त्यांचा हेतू आहे.

शोभना कांबळे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : फुलपाखरांची रंगीबेरंगी दुनिया आबालवृद्धांना वेगळाच आनंद देते. विविध झाडांकडे आकर्षित होणाऱ्या या फुलपाखरांचे रम्य असे छोटेसे विश्व रत्नागिरीत तयार करण्याचा प्रयत्न येथील उद्योजक नंदकुमार पटवर्धन करीत आहेत. त्यांच्या सुमारे साडेसहा एकरवर असलेल्या वनस्पती उद्यानात हे उद्यान तयार करण्यात येत असून, सहा महिन्यांच्या कालावधीत रत्नागिरीकरांना या उद्यानात विविध प्रकारची फुलपाखरेही पाहायला मिळणार आहेत.

पटवर्धन यांनी या जागेत आसमंत बेनवोलन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून २०१६ सालापासून वनस्पती उद्यान सुरू केले असून, यात ४५ प्रकारची सुमारे २४५ झाडे लावली आहेत. यात पळस, कढूलिंब, कडीपत्ता, अशोका आदी प्रकारच्या झाडांचा समावेश आहे. या उद्यानात गेल्यानंतर विविध पक्ष्यांचे मधूर आवाज ऐकून मन प्रसन्न होतेच पण नैसर्गिक जैवविविधतेचेही दर्शन घडते. या पक्ष्यांबरोबरच रंगीबेरंगी फुलपाखरांचा विहार बघून चित्त उल्हसित होते. या उद्यानाला पक्षीमित्र किरण पुरंदरे तसेच रत्नागिरीतील विविध क्षेत्रातील मंडळींनी भेट दिली आहे.

फुलपाखरांच्या देशात १५०० प्रजाती असून, महाराष्ट्रात २३० प्रजाती आहेत. मुंबई आणि परिसरातच १५० प्रजाती आहेत. कोकणात चांगल्या प्रकारे जैवविविधता असल्याने या भागातही १००पेक्षा अधिक फुलपाखरांच्या जाती आढळतात. गेल्या काही वर्षांपासून वृक्षतोड झाल्याने या फुलपाखरांचा अधिवासही नष्ट व्हायला लागलाय. परागकण वाहून नेण्यात फुलपाखरांची मदत होते. फुलपाखरे अधिक असलेल्या ठिकाणचे पर्यावरण चांगले समजले जाते. त्यामुळे फुलपाखरू संवर्धनासाठी आवश्यक झाडे लावणे गरजेचे झाले आहे. त्यामुळेच 'आसमंत' आणि ठाणे येथील शहरी जैवविविधता ग्रुप यांच्या सहकार्यातून फुलपाखरू उद्यान तयार करण्यात येत आहे.

जैवविविधतेच्या माहितीचा विचार करून पटवर्धन यांनी या उद्यानातच फुलपाखरांचे उद्यान बनवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी फुलपाखरांना आकर्षित करणारी इतर झाडेही या उद्यानात लावण्यात येत आहेत. वनस्पतीशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या मुलांसाठी भविष्यात प्रयोगशाळा म्हणून या उद्यानाचा उपयोग व्हावा, अशी इच्छा निसर्गप्रेमी पटवर्धन व्यक्त करतात.

## जैवविविधतेचे जतन

कोकणात जैवविविधता मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र, त्याबाबत अजूनही जागरुकता नाही. ही जैवविविधता जतन करणे, पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने गरजेचे आहे. ठाणे येथील शहरी जैवविविधता ग्रुप यासाठी प्रयत्न करीत आहे. अगदी शहरी भागातही टेरेसच्या जागेत विविध झाडे लावून फुलपाखरांना आकर्षित करून त्यांचा अधिवास मिळवून देता येतो, असे मत या ग्रुपचे समीर गुळ्वणे यांनी व्यक्त केले.



## पर्यावरण जागृती

'आसमंत' आणि ठाणे येथील शहरी जैवविविधता ग्रुप यांच्यावतीने ९ जून रोजी सकाळी १० वाजता मारुती मंदिर येथील हॉटेल कार्निवल येथे पर्यावरण जागृतीविषयक कार्यक्रम होणार आहे. यासाठी शहरी जैवविविधता ग्रुपचे समीर गुळ्वणे आणि संदीप रानडे रत्नागिरीत आले आहेत. या कार्यक्रमात ते फुलपाखरांसंदर्भात वैविध्यपूर्ण माहिती देणार असून, त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक झाडे, याविषयीही माहिती देणार आहेत.

लोकमत



रत्नागिरीत रविवारी आसमंत फाऊंडेशनतर्फे फुलपाखरु उद्यानासंदर्भात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'आसमंत'चे नंदकुमार पटवर्धन यांनी संस्थेची माहिती दिली. या कार्यक्रमाला ठाणे येथील शहरी जैवविविधता ग्रुपचे संदीप रानडे व समीर गुळवणे उपस्थित होते.

## समीर गुळवणे : आसमंत फाऊंडेशनतर्फे उद्यानासंदर्भात माहिती

# फुलपाखरे ही सशक्त पर्यावरणातील महत्त्वाचा घटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** फुलपाखरे ही वनस्पतीतज्ज्ञ व रसायनतज्ज्ञ असून, सशक्त पर्यावरणातील महत्त्वाचा घटक आहेत. त्यामुळे त्यांचे संवर्धन हे झालेच पाहिजे. त्यासाठी आपण राहतो तेथेच फुलपाखरांसाठी आवश्यक झाडे लावा, असे आवाहन ठाणे शहरी जैवविविधता ग्रुपचे प्रमुख समीर गुळवणे यांनी रविवारी आयोजित कार्यक्रमात केले. आसमंत बेनेवोलन्स फाऊंडेशनतर्फे रत्नागिरी एमआयडीसीतील वनस्पती उद्यानात होणाऱ्या फुलपाखरू उद्यानाने याला गती मिळेलच. नागरिकांनी यासाठी योगदान दिले पाहिजे, असेही गुळवणे यांनी सांगितले.

येथील आसमंत बेनेवोलन्स फाऊंडेशनच्या फुलपाखरू उद्यानाची माहिती देण्याकरिता हॉटेल कार्निव्हल येथे एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात गुळवणे व संदीप रानडे यांनी ठाणे जैवविविधता ग्रुपची माहिती दिली. फुलपाखरांच्या संवर्धनासाठी ग्रुप काय करतो, याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी फुलपाखरांसंदर्भात आश्चर्यकारक माहिती व काही व्हिडिओसुद्धा दाखवले.

फुलपाखरांच्या सुमारे १,५०० जाती भारतात आढळतात. महाराष्ट्रात २२५ प्रकारची व ठाण्यात ४० ते ५० प्रकारची फुलपाखरे दिसतात. रत्नागिरीतही असा अभ्यास झाला पाहिजे. फुलपाखरू संवर्धनासाठी नागरिकांनी पुढे येऊन खारीचा वाटा उचलला पाहिजे. 'आसमंत'ने निसर्गविषयक कार्टून स्पर्धा घ्यावी, असेही गुळवणे यांनी सुचवले. लहान मुलांमध्ये निसर्गविषयक जाणीव जागृती केली पाहिजे. १९३५मध्ये फुलपाखरू उद्यान करण्यात आले होते. त्यानंतर खूप अभ्यास करण्यात आला. मेक्सिकोतून ४ हजार किलोमीटरचा प्रवास करून फुलपाखरे कॅनडात जातात. ती कशी जातात, यावर अजून संशोधन सुरू आहे, अशी माहिती गुळवणे यांनी दिली.

आसमंत फाऊंडेशनचे प्रमुख नंदकुमार पटवर्धन यांनी वनस्पती उद्यान व नव्याने होणाऱ्या फुलपाखरू उद्यानाची माहिती दिली. यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रत्नागिरीतील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी फुलपाखरू उद्यानासाठी योगदान देऊ, असे आश्वासन दिले.

### 'आसमंत'चा पुढाकार

- फुलपाखरांच्या संवर्धनासाठी 'आसमंत'ने पुढाकार घेतला.
- वनस्पती उद्यानात फुलपाखरू उद्यान उभारण्यात येणार.
- फुलपाखरू संवर्धनासाठी रत्नागिरीत जागृती.

# फुलपाखराच्या प्रजातींवर रत्नागिरीतही संकट

## समीर गुळवणे यांचे मत ; आसमंततर्फे एमआयडीसीत उद्यान

[illegible]



रत्नागिरी : फुलपाखरू उद्यानाची माहिती देताना समीर गुळवणे.

### पाणथळ जागाही धोक्यात

[illegible]

[illegible]